अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# भाजपाच्या जाहीरनाम्याचे राष्ट्रपतींकडून वाचन

नवीन लग्न झालेली वधू सासरी येताना अनेक नवीन गोष्टी करण्याचे मनामध्ये ठरवित असते. तिची अवस्था 'नववधू प्रिया मी बावरते' अशा स्वरुपाची असते. नरेंद्र मोदी यांचीदेखील काहीशी अशीच अवस्था झालेली दिसते. त्यांना जरी गुजरात सरकार चालवण्याचा अनुभव असला तरी राष्ट्रीय पातळीवर हे गुजरातच्या विकासाचे मॉडेल जसेच्या तसे आणणे शक्य नाही हेही त्यांच्या लक्षात आलेले दिसते. राष्ट्रपतींच्या अभिभाषणातून त्यांनी आपल्या सरकारच्या कार्याची दिशा काय राहील याचा अजेंडाच जाहीर केला. तसे पाहिले तर राष्ट्रपतींच्या अभिभाषणामध्ये कोणताही नवीन मुद्दा दिसत नाही. खरे सांगायचे तर हे अभिभाषण म्हणजे भारतीय जनता पार्टीचा लोकसभा निवडणुकीतील जाहीरनामा आहे. त्याचे जाहीर वाचन मोदी सरकारने राष्ट्रपती प्रणव मुकर्जी यांच्याकडून करवून घेतले. या अभिभाषणाची प्रत आणि जाहीरनाम्यातली प्रत शेजारी शेजारी ठेवली तर अनेक मुद्दांमध्ये समानता असल्याचे दिसून येईल. मग अगदी परंपरा जपण्याच्या आश्वासनापासून ते जनतेचा विश्वास संपादन करण्यापर्यंत त्याच गोष्टी वाचायला मिळतील. त्याच्या जोडीने पर्यटन किंवा करप्रणाली याबाबत सुधारणा करण्याचे वचन भाजपाच्या जाहीरनाम्यामध्ये होते. आणि तोच मुद्दा वेगवेगळ्या पध्दतीने अभिभाषणामधून मांडला गेला आहे. संसदीय परंपरेप्रमाणे नव्या लोकसभेचे अधिवेशन सुरू होण्यापूर्वी राष्ट्रपतींचे दोन्ही सभागृहातल्या सदस्यांसमोर अभिभाषण होते. साधारणपणे नव्या सरकारची ध्येयधोरणे काय असतील याचीच माहिती या अभिभाषणामधून देण्याचा प्रयत्न होतो. परंपरा म्हणून ही गोष्ट जरी सांगत असतील, तरी आतापर्यंतचा अनुभव लक्षात घेतला तर अभिभाषणाप्रमाणे सरकार काम करते असे सांगता येत नाही. अनेकवेळेला तर अभिभाषणामध्ये फार मोठ्या-मोठ्या गप्पा मारलेल्या असतात. प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होत नाही. भारतीय जनता पार्टीला पूर्ण बहुमत मिळण्याचा प्रकार यावेळी घडला. मोदी यांना पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून घोषित करण्यात आले होते. मनमोहन सिंग सरकारच्या नाकर्तेपणाचा भरपूर फायदा भारतीय जनता पार्टीला झाला. अपेक्षेपेक्षा या पक्षाला जास्त जागा मिळाल्या. आता या सगळ्या नव्या नवलाईचा परिणाम मोदी सरकारवर राहणे स्वाभाविक आहे. त्या उत्साहाच्या भरात अनेक घोषणा होतील. लोकांना फक्त केलेल्या घोषणा सरकार पूर्ण कशा करणार याचीच उत्सुकता राहणार आहे.

## नव्या सरकारचे नवलाईचे दिवस

काही दिवस ज्याप्रमाणे भारतीय जनता पार्टी उत्साहात काम करेल त्याचप्रमाणे या नव्या सरकारविषयी प्रसारमाध्यमांच्या मनामध्येही आकर्षण राहील. सामान्य जनतासुध्दा मोदींच्या अगदी बारीकसारीक हालाचालींवर किंवा घोषणांवर नजर ठेवून राहील. कारण स्वतंत्र भारतामध्ये पहिल्यांदाच पूर्णपणे एखाद्या विरोधी पक्षाला बहुमत मिळण्याचा प्रकार घडला आहे. त्यातही स्वत:ची स्वच्छ प्रतिमा निर्माण केलेल्या भाजपाला सरकार बनवण्याची संधी मिळालेली आहे. अशा अनेक नवनवीन गोष्टींचा समावेश असल्यामुळे या मोदी सरकारची निदान या येत्या वर्षभरात भरपूर चर्चा आणि प्रसिध्दी होत राहील. ही एक स्वाभाविक गोष्ट ठरते. प्रश्न एवढाच आहे की, निवडणुकांमध्ये पक्षाचा जाहीरनामा घोषित होणे आणि प्रत्यक्ष सरकार चालवताना त्याचे घोषणेत रुपांतर होणे यात बराच फरक पडतो. कारण जाहीरनाम्याबाबत जनता साशंक असते. अधिकृतपणे त्याच गोष्टी जेव्हा राष्ट्रपतींच्या, पंतप्रधानांच्या तोंडून बाहेर पडतात त्यावेळेला त्या पूर्ण करण्याची जबाबदारी सरकारवर येऊन पडत असते. अभिभाषणामध्ये अनेक गोष्टींचा उहापोह झालेला आहे. देशभरात शंभर महानगरांची निर्मिती, युवकांसाठी स्वतंत्र टॅलेंट मिशन, प्रत्येक राज्यामध्ये आयआयटी आणि आयआयएमची स्थापना, २०२२ पर्यंत देशातल्या प्रत्येक गरिबाला घर आणि नोकरी, शेतकऱ्यांसाठी अधिक अर्थपुरवठा करणाऱ्या योजना, महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण, सार्वजनिक धान्य वितरण प्रणालीमध्ये सुधारणा, काळा पैसा भारतात आणण्याची घोषणा, एकूणच विस्कळीत असलेली करप्रणाली सुधारित करून एकच कर लागू करण्याचा मोदी सरकारचा विचार, 'एक भारत श्रेष्ठ भारत' अशी घोषणा देऊन भ्रष्टाचाराचे निर्मूलन करण्याचा निर्धार अभिभाषणातून पुन्हा व्यक्त झाला आहे. या सगळ्याच घोषणा फक्त पाच वर्षांत कार्यान्वित होऊ शकणार नाहीत. मोदी यांच्याजवळ काही जादूची कांडी नाही, हे सामान्य जनतेलाही कळते. मोदींनाही खूप काही करायचे असेल, परंतु त्यासाठी नुसता घोषणेचा पाऊस न पाडता ठरावीक मुदतीत ठरावीक गोष्टी पूर्ण करण्याची तयारी त्यांनी ठेवली पाहिजे. अन्यथा नव्याने स्थापन झालेले सरकार उत्साहाच्या भरात फक्त बडबड करीत राहील आणि कामांचा मात्र कोणताच पत्ता नसेल असे होता कामा नये.

## बडबडीपेक्षा काम हवे

यापूर्वीच्या काँग्रेस सरकारपेक्षा भाजपाचे सरकार वेगळे काहीतरी करून दाखवेल, असा विश्वास लोकांना वाटतो. ज्या गुजरात विकासाचे कौतुक केले जाते, त्या गुजरातचा पन्नास टक्के विकास होण्यासाठी मोदींना पंधरा वर्षे घालवावी लागली. या राज्यात विकासाची साठ-सत्तर टक्के कामे करण्याकरिता जर पंधरा वर्षे लागत असतील तर संपूर्ण देशाच्या विकासासाठी किती कालावधी लागेल याचा अंदाजच बांधलेला बरा. म्हणूनच मोदींनी अनाठायी लोकांच्या अपेक्षा वाढवू नयेत. त्यापेक्षा मोजून पाचच गोष्टी निवडाव्यात आणि पाच वर्षांमध्ये त्याची अंमलबजावणी करून दाखवावी. मात्र या पाच गोष्टींमुळे सामान्य जनतेच्या जीवनामध्ये मूलभूत फरक पडला पाहिजे. त्याला दिलासा मिळाला पाहिजे. जोपर्यंत वेळापत्रक ठरवून कामाची अंमलबजावणी केली जात नाही, तोपर्यंत या घोषणा वल्गनाच म्हणाव्या लागतील. २०२२ ला भारताच्या स्वातंत्र्याला पंच्याहत्तर वर्षे पूर्ण होतील. तोपर्यंतच्या काही योजना मोदींनी आतापासूनच मनामध्ये योजल्या आहेत. याचा अर्थ मोदींना पंतप्रधानपद उपभोगायचे आहे असे दिसते. त्यांनी जर ज्यासाठी स्वातंत्र्य मिळाले ते स्वातंत्र्य सुराज्यामध्ये बदलून दाखवले तर लोकच त्यांना राज्य करण्याची संधी देतील. खरे तर राष्ट्रपतींकडून एवढा सगळा जाहीरनामा वाचून घेण्याचे काही कारण नव्हते. पाच वर्षांसाठी पाच-दहा गोष्टींचे उद्दीष्ट निश्चित करता आले असते आणि प्रसिध्दी गडबडीपेक्षा काम करून दाखवण्यावर त्यांना जोर देता आला असता.